पिंपरी चिंचवड महानगर पालिका,
पिंपरी ४११ ०१८
माहिती व तंत्रज्ञान विभाग
क्र. मातवि/११/कावि/220/२०१७
दिनांक ०३/०७/२०१७

**विषय- वस्तु व सेवा कराच्या अनुषंगाने संगणक प्रणाली मधिल बदलां बाबत.**

**परिपत्रक,**

२/- दिनांक १ जुलै २०१७ रोजी भारतात सर्वत्र वस्तु व सेवा कर लागु करण्यात आलेला असुन त्या अनुषंगाने मनपाच्या काही विभागांच्या संगणक प्रणालीत बदल करणे आवश्यक आहे. याबाबत लेखा विभागास पत्र क्र. मांत/६/कावि/३०१/२०१७ दि. २७ जुन २०१७ अनव्ये विचारणा करणेत आलेली होती. त्यानुसार महापालिकेचे सदनी लेखापाल श्री. सतिश नगरे यांचे प्रतिनिधी व लेखाधिकारी यांचे कडे बैठकीमध्ये चर्चा करणेत आलेली आसुन आवश्यक सुचना देणेत आलेल्या असले बाबत मुख्यलेखापाल यांनी पत्र क्र. लेखा/५/कावि/८३१/२०१७ दि. ३०/०६/२०१७ अन्वये कळविलेले आहे. तसेच लेखा विभागा कडील परिपत्रक क्र. लेखा/५/कावि/८१८/२०१७ दि. २७/०६/२०१७ अन्वये वस्तु व सेवा कराच्या कपाती बाबत मनपाचे सदनी लेखापाल श्री. सतिश नगरे व त्यांचे प्रतिनिधी श्री. स्वरुप चिंगळे यांचेशी आवश्यक माहीती सह संपर्क साधणे बाबत कळविलेले आहे.

या परिपत्रकान्वये सर्व शाखा प्रमुखांना कळविणेत येते की आपले विभागासाठी वापरात असलेल्या संगणक प्रणाली मध्ये वस्तु व सेवा कराच्या अनुषंगाने काही बदल करावयाचा असल्यास त्या बाबतची सविस्तर माहिती, माहिती व तंत्रज्ञान विभागास दि. ०७ जुलै २०१७ पर्यंत कळविणेत यावी.

**अतिरिक्त आयुक्त**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी ४११ ०१८**

प्रति,
सर्व संबधित शाखाप्रमुख